# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## SAVITRBAI PHULE PUNE UNIVERSITY

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION (CDOE)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

### तृतीय वर्ष बी.कॉम. (वार्षिक पद्धती) प्रवेश सूचना – शैक्षणिक वर्ष २०२५-२६

### T.Y.B.Com. (Annual System) Admission Notice – A.Y. 2025-26

दि.: २८/०८/२०२५ Date: 28/08/2025

मुक्त व दूरस्थ अध्ययन माध्यमातील तृतीय वर्ष बी.कॉम. (वार्षिक पद्धती) या वर्गाचीऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ पासून दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या www.unipune.ac.in/sol/admission2025.html या संकेतस्थळावर सुरु होत आहे. याबाबत सविस्तर सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

The online admission process for T.Y.B.Com. (Annual System) through 'Open and Distance Learning' mode will begin from Monday, 1st September 2025 on CDOE website www.unipune.ac.in/sol/admission2025.html. The detail instructions are attached herewith.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे:**

| | |
|---|---|
| ऑनलाईन प्रवेश अर्जाची सुरुवात: | दि. ०१/०९/२०२५, सकाळी ११ वाजेपासून |
| ऑनलाईन प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरण्याची अंतिम मुदत: | दि. १५/०९/२०२५, सायंकाळी ५ वाजेपर्यंत |

**The schedule of Admission Process is as follows:**

| | |
|---|---|
| Starting of Online Admission Form and Fees Payment: | From 11:00 am on 01/09/2025 |
| Last date for online submission of Form and Fees: | Till 05:00 pm on 15/09/2025 |

*Sd/-*

Director, CDOE
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## तृतीय वर्ष बी.कॉम. (वार्षिक पद्धती) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना

### Instructions for Students applying for Admission to T.Y.B.Com. (Annual System)

| | |
|---|---|
| १) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (पूर्वीचे मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा) येथे शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ किंवा २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष बी.कॉम. या वर्गामध्ये प्रवेशित विद्यार्थी प्रथम वर्ष बी.कॉम. परीक्षा उत्तीर्ण आणि द्वितीय वर्ष बी.कॉम. परीक्षा उत्तीर्ण किंवा एटीकेटी (ATKT) प्राप्त असतील, तर अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तृतीय वर्ष बी.कॉम. (वार्षिक पद्धती) या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल. | 1) The students who have enrolled for F.Y.B.Com. in Academic Year 2020-21, 2021-22 or 2022-23 in Centre for Distance and Online Education (Previously School of Open and Distance Learning) of Savitribai Phule Pune University and passed F.Y.B.Com. Examination and further passed or obtained ATKT in S.Y.B.Com. Examination can take admission to T.Y.B.Com. (Annual System) in A.Y. 2025-26. |
| २) बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या नोंदणीची वैधता ६ वर्षे इतकी आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांना बी.कॉम. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी जून-२०२६ सत्रातील परीक्षा ही अंतिम संधी असेल.) | 2) All the students should note that the validity of the registration for B.Com. is 6 years. (Students enrolled for F.Y. B.Com. in A.Y. 2020-21 can complete course in June-2026 exam only) |
| ३) प्रवेश प्रक्रियेसाठीची लिंक दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या संकेतस्थळावर देण्यात आली असून सदर लिंक सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून चालू होईल. | 3) The link to submit Online Admission form has been displayed on the website of CDOE and the link will open at 11 AM on Monday, 1st September 2025. |
| ४) विद्यार्थ्यांना त्यांचा नोंदणी (PRN) क्रमांक आणि **yymmdd** या स्वरूपात जन्मदिनांक वापरून लॉगीन करायचे आहे. पुढे विषय निवडून प्रवेश शुल्क भरायचे आहे. | 4) Student has to login by using PRN number and date of birth in **yymmdd** format as password. Next student has to select the subjects & pay the fees. |
| ५) द्वितीय वर्षास निवडलेला वैकल्पिक विषय तृतीय वर्षास देखील लागू असेल. | 5) The optional subject selected at S.Y. shall continue for T.Y. also. |

| | |
|---|---|
| ६) प्रवेश शुल्क भरल्यानंतर प्रवेश अर्ज (PDF) डाउनलोड करायचा आहे. शुल्क भरल्यानंतर प्रवेश अर्ज त्वरित डाउनलोड होत नसेल तर, PDF कॉपी २४ तासांनी डाउनलोड होईल. | 6) Student has to download Admission Form (PDF) after Fee payment. If PDF copy is not getting downloaded after payment, then it will get downloaded after 24 hours. |
| ७) प्रवेश अर्ज (PDF Copy) तसेच त्याची प्रिंट काढून विद्यार्थीनी स्वत:जवळ जपून ठेवावी. प्रवेश अर्जाची छापील प्रत (print) अभ्यास केंद्रावर जमा करण्याची आवश्यकता नाही. | 7) Students should carefully preserve the PDF copy and it's Print with themselves. Students need not to submit the printed form to the Study Centre. |
| ८) प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होतील.<br>अ) पुणे शहरातील विद्यार्थ्यांना विद्यापीठामधील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामधून दि. १ सप्टेंबरपासून दुपारी २.३० ते ५.३० या वेळेमध्ये पुस्तके उपलब्ध होतील. पुस्तके घेण्याकरिता विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याच्या प्रतिनिधीने प्रवेश अर्जाची छापील प्रत (print) जमा करणे आवश्यक आहे.<br>ब) पुणे शहराबाहेरील अभ्यास केंद्रांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यास केंद्रांवर दि. २० सप्टेंबर नंतर पुस्तके उपलब्ध होतील. याबाबत संबंधित अभ्यास केंद्रांकडून विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल. | 8) The study material (books) will be distributed to the students after admission process.<br>a) Students from Pune city can collect the books from 1st September (within 2.30 pm to 5.30 pm) from CDOE office. Student or hi/her representative can collect the books by submitting printed copy of the admission form.<br>b) For the students from Study Centres outside Pune City, the books will be made available at their centres after 20th September. The concerned Study centres will inform the students regarding the books. |
| ९) विषयनिहाय संमंत्रण सत्रांचे वेळापत्रक दि. ३० सप्टेंबरपर्यंत देण्यात येईल आणि अंतर्गत मूल्यमापनाकरिता स्वाध्याय प्रश्न दि. १० ऑक्टोबरपर्यंत देण्यात येतील. | 9) The schedule of subjectwise counselling sessions will be given by 30th September & the Assignments for Internal Evaluation will be given by 10th October. |
| १०) प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही समस्या असल्यास विद्यार्थ्यांनीstudent.sol@unipune.ac.in या ईमेल-आयडीवर संपर्क करावा. | 10) For query, if any regarding Admission process, the students can write to student.sol@unipune.ac.in |